Maratha Vidya Prasarak Samaj
G. M. D. Arts, B. W. Commerce and Science College,
Sinnar, Dist. Nashik

Affiliated to Savitribai Phule Pune University, Pune Id.No.PU/NS/ASC/013/1969 NAAC Reaccredited 'A' Grade (CGPA 3.04)
Best College Awarded by SPPU2012-13 AISHE:C-41292
www.gmdcollege.in ISO 9001:2015 Certified College sinnarcollege001@yahoo.com


## Internal Quality Assurance Cell (2021-2022)

## Report of Event/Programme

| | | | |
|---|---|---|---|
| **Name of the Department/committee** | Economics | | |
| **Name of the Coordinator** | Dr . A. N. Pagar | | |
| **Title of the Event/Programme** | Workshop On Gender Sensitization | | |
| **Date/Period of Event/Programme** | 08/03/2022 | | |
| **Objective of the event/Programme** | 1. Helps in Changing the attitude and mindset of individuals<br>2. Creating awareness regarding gender equality issues and modifying the behavior and views that people hold about themselves and other genders. | | |
| **Sponsored Agency/Institute** | G.M.D. Arts, B.W. Commerce and Science College, Sinnar | | |
| No. of the Teacher involved in organizing activity- | Male: 05 | Female: 03 | Total: 08 |
| No. of the Students involved in organizing activity- | Male: | Female: | Total: |
| **Total involved in organizing activity-** | **Male: 05** | **Female : 03** | **Total: 08** |
| No. of the Participant-Students | Male: | Female: | Total: |
| No. of the Participant-Teachers | Male: 23 | Female: 23 | Total : 46 |
| No. of the Participants other than Teachers/Students | Male: | Female: | Total: |
| **Total Participants-** | **Male : 23** | **Female : 23** | **Total : 46** |
| **Name of the Expert/Invitee/Lecturer (With Designation, Contact, Address & email etc.)** | 1. Adv. Aannasaheb Sonawane<br>2. Miss. M. H. Gawali<br>3. Shri. Surendra Gujrathi | | |
| **Impact of extension activities in sensitizing students to social issues and holistic development.(Two lines)** | - | | |
| **Outcome of the activity** | Successfully completed objectives……. | | |
| **Expenditure (Rs) (if Any)** | Resource Person: Rs - Nil<br>Flex : Rs - Nil<br>Break Fast and Lunch: Rs - Nil | | |
| **Venue of the Event/ Programme** | Seminar hall , G.M.D. Arts, B.W. Commerce and Science College, Sinnar | | |

## Internal Quality Assurance Cell (2021-2022)

## Report of Event/Programme

### ६१ जागतिक महिला दिन - मा.श्री. सुरेंद्र गुजराथी (जेष्ठ रंगकर्मी)



मानवी जीवनाची वीण घट्ट ठेवणारी, कुटुंब आणि समाजाचा महत्वाचा घटक म्हणून महिलांकडे पाहिले पाहिजे. नातवाला आजी हवी असते. भावाला बहीण हवी असते. संसाराला पत्नी हवी असते आणि ती जर नसेल तर तिच्याविना राजवाडासुद्धा सुना पडतो.

आजच्या स्त्री समोर जिजाबाई, लक्ष्मीबाई, सावित्रीबाई यांचा आदर्श आहे. आज महिला उच्च शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात भरारी घेत आहेत, पुरुषांच्या बरोबरीने त्या आपली योग्यता सर्वच क्षेत्रात सिद्ध करत आहे. असे असले तरी काही दुर्गम भागांत महिलांच्या शिक्षणाबाबत अजूनही उदासीनता पाहायला मिळते. मुलींची लवकर लग्न केली जातात आणि त्यामुळे त्यांचे शिक्षण अपुरे राहते. या दृष्टीने महिलांना सासरी आणि माहेरी शिक्षणचा मुलभूत हक्क मिळायलाच हवा, त्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

निसर्गाने स्त्रीला पुरुषांपेक्षा भरभरुन वरदान दिलेले आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे निसर्गाने स्त्रीला दिलेली पवित्र अशी नवनिर्मितीची देणगी, यातूनच मानव समाजाची निर्मिती झाली आहे. यादृष्टीने महिलांचे पावित्र्य, सन्मान, हक्क, अधिकार अबाधित राखणे आपली जबाबदारी आहे, त्यासाठी आपण कटिबद्ध होऊया.

### ५६ महिला सबलीकरण - डॉ. श्रीमती एम. एच. गवळी (क्रीडा संचालक, सिडको महाविद्यालय नाशिक)



'महिला सबलीकरण' म्हणजे स्त्रियांनी सक्षम, सशक्त आणि आत्मनिर्भर बनणे होय. आपले जीवन आपण स्वतःच घडवत असतो, त्यासाठी आत्मविश्वास फार महत्वाचा आहे. महिलांना शारीरिक, मानसिक दृष्टीने सबल करण्यासाठी योग महत्त्वाचा आहे, त्याला जीवनशैलीचा भाग बनवा. सकारात्मक विचारांनी यश निश्चितच मिळते, आपण जे ठरवलं ते होत असतं म्हणून आपल्याला काय व्हायचं आहे, ते ठरवून त्या दिशेने वाटचाल सुरू केली पाहिजे. सबलीकरणातील प्राथमिक टप्पा शारीरिक सबलतेचा आहे, त्याचाच आपल्या मन व आत्मविश्वासावर परिणाम होतो म्हणून विद्यार्थिनींना स्वसंरक्षणासाठी योग, व्यायाम, कराटे यांचे प्रशिक्षण घेऊन नियमित सराव करावा.

महिलांनी आज विविध क्षेत्रांत भरारी घेतली आहे यातूनच वेगवेगळ्या परीस्थितींचा सामना त्यांना करावा लागतो. कठीण कामे, यांत्रिक काम, एकटीने प्रवास या सारख्या अनेक ठिकाणी महिलांना आपल्या पूर्ण क्षमता वापरुन स्व-संरक्षण करता आले पाहिजे. महिलांनी मानसिक दृष्ट्याही कणखर असायला पाहिजे. जशी आपली मानसिकता असते तसेच आपल्याबरोबर घडत असते म्हणून नेहमी सकारात्मक विचार व आत्मविश्वासपूर्ण कृती करणे महत्वाचे आहे.

CO-ORDINATOR
IQAC
G.M.D. Arts, B.W. Commerce
And Science College, Sinnar

G.M.D. ARTS, B.W. COM. & SCIENCE COLLEGE ★ SINNAR 422 103

Principal
G. M. D. Arts, B. W. Commerce and
Science College, Sinnar, Dist.Nashik